# UGC Journal Details

| | |
|---|---|
| **Name of the Journal :** | Research Journey |
| **ISSN Number :** | |
| **e-ISSN Number :** | 23487143 |
| **Source:** | UNIV |
| **Subject:** | Marathi |
| **Publisher:** | Swatidhan International Publication |
| **Country of Publication:** | India |
| **Broad Subject Category:** | Multidisciplinary |

Print

Commerce & Science College, KVN Naik Arts, IQAC OFFICE

Co-ordinator
I.Q.A.C.
KVN Naik Arts, Commerce
& Science College, Canada Corner,
Nashik-422 002.

विश्वविद्यालय अनुदान आयोग
University Grants Commission
quality higher education for all
(https://www.ugc.ac.in/)

FAQs (https://www.ugc.ac.in/faq.aspx)
RTI (https://www.ugc.ac.in/subpage/RTI-Act.aspx)
Tenders (https://www.ugc.ac.in/Tenders.aspx)
Jobs (https://www.ugc.ac.in/ugc_jobs.aspx)
Press Release (https://www.ugc.ac.in/ugc_pressrelease.aspx)
अ (https://www.ugc.ac.in/hindi/)
Contact Us (https://www.ugc.ac.in/contact.aspx)

# UGC Approved List of Journals

|| Home (journal_list.aspx) ||

You searched for r

**Total Journals : 1436**

Show 25 entries Search: Research journey

| View | Sl.No. | Journal No | Title | Publisher | ISSN | E-ISSN |
|---|---|---|---|---|---|---|
| View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDA3MDU=) | 1168 | 40705 | Research Journey International E Research Journal | Swatidhan Pub. Yevla | | 23487143 |
| View (ugc_admin_journal_report.aspx?eid=NDQxMTc=) | 1220 | 44117 | Research Journey | Swatidhan International Publication | | 23487143 |

Showing 1 to 2 of 2 entries (filtered from 1,436 total entries) Previous 1 Next

## For UGC Officials

- e-Office (https://ugc.eoffice.gov.in/acl_users/credentials_cookie_auth/require_login?came_from=https%3A//ugc.eoffice.gov.in/)
- NIC mail (https://mail.gov.in/iwc_static/c11n/allDomain/layout/login_gov2.jsp?lang=en&3.0.1.2.0_15121607&svcs=abs,im,mail,smime,calendar,c11n)
- RTI online (https://rtionline.gov.in/RTIMIS/login/index.php)
- PG portal (https://pgportal.gov.in)

Co-ordinator I.Q.A.C. KVN Naik Arts, Commerce & Science College, Canada Corner, Nashik-422 002.

KVN Naik Arts, Commerce & Science College IQAC OFFICE

Impact Factor – 3.452 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

RESEARCH JOURNEY


Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January-2018

SPECIAL ISSUE-XXXV

# स्पर्धा परीक्षा आणि मराठी




संपादक मंडळ :
विशेषांक कार्यकारी संपादक
प्रा. अर्जुन नेरकर
डॉ. शैलजा पाटील
प्रा. गजानन भामरे
डॉ. स्नेहल मराठे
प्रा. विद्या सुर्वे
डॉ. विनोद गोरवाडकर

मुख्य संपादक :
डॉ. धनराज धनगर

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal List No. 40705 & 44117
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

ATTESTED
PRINCIPAL
LOKNETE GOPINATHJI MUNDE
Institute of Engineering Education & Research
Canada Corner Nashik-422 002

SWATIDHAN PUBLICATIONS

**Impact Factor – 3.452** **ISSN – 2348-7143**

## INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**January-2018**
**SPECIAL ISSUE-XXXV**

# स्पर्धा परीक्षा आणि मराठी

**संपादक मंडळ**

**विशेषांक कार्यकारी संपादक**
प्रा. अर्जुन नेरकर
डॉ. शैलजा पाटील
प्रा. गजानन भामरे
डॉ. स्नेहल मराठे
प्रा. विद्या सुर्वे
डॉ. विनोद गोरवाडकर

**मुख्य संपादक**
डॉ. धनराज धनगर

**SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS**

For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher **Price : Rs. 225/-**

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 35 : स्पर्धा परीक्षा आणि मराठी
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
January 2018

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Co-Editors -**

- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, **Riyadh Kingdom** of **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Dr. Gajanan Wankhede** - Baliram Patil College, Kinwat-Nanded **[M.S.] India**.
- **Prof. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal. Arts, Science, Commerce College. Harsul.
- **Prof. Atul Suryawanshi** - S. S. M. M. College, Pachora.
- **Prof. B. P. Shewale** - M. S. G. College, Malegaon Camp, Nashik.

**Advisory Board -**

- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. D. A. Suryawanshi** - Principal, R. C. Patel College of Education, Shirpur, **Dhule.**
- **Dr. Sandip D. Mundhe** - Head, Lib. Science, Sambhajirao Kendre College, **Jalkot, Latur**
- **Dr.Y. H. Saner** - Principal, Abhay College of Education, **Dhule**
- **Dr. D. D. Patil** - Principal, Arts, Science and Commerce College, Chopda, **Jalgaon**

**Review Committee -**

- **Dr. Uttam V. Nile** - P. S. G. V. P. Mandals Arts, Cmmerce, Science College, Shahada
- **Dr. Sanjay Dhondare** - Abhay Womens College, Dhule
- **Dr. Rekha Gajare** - Head, Dept. of Hindi, P.O.Nahata College, Bhusawal
- **Dr. Ramesh Sambhaji Kure** - Head, N. W. College, Akhala Balapura Dist-Hingoli
- **Dr. S. K. Wadekar** – Principal, Arts, Science & Commerce College, Alephata

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor-**

**Published by -**

- **Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Nashik**

**Email** : swatidhanrajs@gmail.com **Website** : www.researchjourney.net **Mobile** : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013) | January 2018
Special Issue 35 : स्पर्धा परीक्षा आणि मराठी
UGC Approved No. 40705 & 44117

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | शोधनिबंधाचे शीर्षक | लेखक /लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| @ | संपादकीय | - डॉ. धनराज धनगर | ०४ |
| १ | पदवीस्तरीय मराठीचे अभ्यासक्रम : वास्तव आणि अपेक्षा | - डॉ. जितेंद्र गिरासे | ०५ |
| २ | स्पर्धा परीक्षांमधील 'अनिवार्य मराठी'आणि तिचे स्वरूप | - डॉ.राजेंद्र सांगळे | ०९ |
| ३ | स्पर्धा परीक्षा आणि मराठी | - डॉ. बाळकृष्ण लळीत | १३ |
| ४ | मराठी व्याकरण आणि स्पर्धा परीक्षा | - डॉ. आनंदा सोनवणे | १८ |
| ५ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेसाठी मराठी | - डॉ. नामदेव माळी | २८ |
| ६ | स्पर्धा परीक्षा व मराठीचा अभ्यासक्रम | - डॉ. किरण पिंगळे | ३३ |
| ७ | यु.पी.एस.सी. परीक्षेतील मराठी साहित्याचा अभ्यासक्रम | - डॉ.रत्नमाला गोरे | ३७ |
| ८ | राज्यसेवा मुख्य परीक्षेतील मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप | - डॉ. सचिन गिरी | ३९ |
| ९ | मराठी ज्ञानभाषा व व्यवहारभाषा होण्यासाठी ...! | - डॉ. मधुकर मोकाशी | ४१ |
| १० | स्पर्धा परीक्षा आणि मराठी साहित्याचे वाचन | - डॉ. एस. आर. खैरनार | ४८ |
| ११ | स्पर्धा परीक्षेत मराठी विषयाचे महत्त्व | - प्रा. मिलिंदकुमार देवरे | ५१ |
| १२ | स्पर्धा परीक्षांमधील मराठी भाषेचे योगदान | - प्रा. अर्जुन नेरकर | ५५ |
| १३ | स्पर्धा परीक्षा आणि सामान्य ज्ञानविषयक मराठी साहित्य | - प्रा. गजानन भामरे | ५७ |
| १४ | महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेसाठी मराठी | - डॉ. वाल्मिक आढावे | ५९ |
| १५ | स्पर्धा परीक्षा, मराठी भाषा आणि साहित्य | - छाया कदम-पवार | ६३ |
| १६ | स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी विषयाचे महत्त्व | - सोनाली लोकडे | ६६ |
| १७ | पदवीस्तरीय मराठीचे अभ्यासक्रम वास्तव आणि अपेक्षा | - प्रा. अनंत मोगल | ६७ |
| १८ | प्रशासनिक मराठी आणि तिचा विकास | - डॉ. जितेंद्र गिरासे, प्रा. ममता भारुडे | ६९ |
| १९ | स्पर्धा परीक्षेतील निबंध लेखनाचे स्वरूप | - डॉ. स्नेहल मराठे | ७५ |
| २० | स्पर्धा परीक्षा आणि मराठी | - अनिता रानवळकर | ७७ |
| २१ | स्पर्धा परीक्षेतील मराठी भाषेचे महत्त्व | - श्री जयवंत कढ्यारे | ७९ |
| २२ | Literature: A Gracious Way for Success in Career and Life | - Prof. M. S. Bhandari | ८१ |
| २३ | The Role of Marathi Language in MPSC | - Prof. R.V. Tribhuvan | ८४ |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वत:कडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे अधिकार प्रकाशक आणि संबंधित लेखकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबंधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत. त्या मतांशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ संहितेची सर्व जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.*

©प्रकाशक : सौ. स्वाती धनराज सोनवणे, संचालिका, स्वातीधन इंटरनॅशनल पब्लिकेशन्स, (येवला) नाशिक.
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net **Mobile** : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF ) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 35 : स्पर्धा परीक्षा आणि मराठी
UGC Approved No. 40705 & 44117
ISSN : 2348-7143
January 2018

## संपादकीय -

मध्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा वाढली आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सार्वत्रिक शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला; शिक्षणाच्या संधी सर्वसामान्यांपर्यंत पोहचल्या त्यामुळे उच्च शिक्षण घेऊन खूप मोठी पिढी बाहेर पडली. पहिल्या पिढीतील या उच्च शिक्षितांना सहज नोकऱ्या मिळाल्या. तथापि सुरुवातीच्या या काळात 'उत्तम शेती आणि कनिष्ठ नोकरी' असे समजले जात होते. त्यावेळी जमिनीचे क्षेत्रफळदेखील जास्त होते. मात्र लोकसंख्या वाढत गेली आणि क्षेत्रफळ कमी कमी होत गेले. सुरुवातीला चांगली पिकणारी जमीन रासायनिक खतांच्या अतिरिक्त वापरामुळे नापीक होऊ लागली, त्यात निसर्गाच्या लहरीपणामुळे शेती व्यवसाय परवडेनासा झाला आणि महाराष्ट्रातील शेतकऱ्याची मुले नोकरी शोधू लागली. पाचव्या वेतन आयोगामुळे सरकारी नोकरांच्या वेतनात चांगली वाढ झाली. सहाव्या वेतन आयोगामुळे वेतनाचा आकडा वाढला आणि सरकारी नोकरी हा प्रतिष्ठेचा विषय झाली. त्यातल्या त्यात सरकारी नोकरी आणि तीही प्रशासकीय अधिकाऱ्याची असेल तर मग बंगला, गाडी, पैसा, प्रतिष्ठा, मान-मरातब, नोकर चाकर अशी स्वप्नसृष्टी या नव्या पिढीसमोर उभी राहिली. परंतु उत्तर प्रदेश, बिहार आणि दक्षिण भारतातील काही राज्यांमधील विद्यार्थीच या प्रशासकीय सेवांच्या परीक्षांमध्ये विशेषतः केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये उत्तीर्ण होतात; ते आपले म्हणजे मराठी माणसाचे कामच नाही अश्या स्वरूपाचा दरारा आणि भीती या स्पर्धा परीक्षांच्या संदर्भात निर्माण केली जात होती.

सुरुवातीला पुणे, मुंबई, नागपूर अश्या मोठ्या शहरांमधून या स्पर्धा परीक्षांविषयी जागृती निर्माण झाली आणि अगदी बोटावर मोजण्याइतके लोक या स्पर्धा परीक्षांमधून प्रशासकीय सेवेत दाखल व्हायला सुरुवात झाली. मागील ५-१० वर्षांपासून ही परिस्थिती खूप मोठ्या प्रमाणावर पालटली आणि स्पर्धा परीक्षेचे हे लोण अगदी खेड्या-पाड्यांपर्यंत जाऊन पोहचले आहे. अगदी नंदुरबार सारख्या आदिवासी भागातील विद्यार्थी सुद्धा स्पर्धा परीक्षा आता देतात आणि त्यात उत्तीर्ण होतात. असे जरी चित्र असले तरी केंद्रीय स्तरावरील परीक्षांमध्ये महाराष्ट्राचा कोटा अजून जेवढा वाढायला पाहिजे तेवढा तो वाढलेला आहे असे मात्र दिसत नाही.

या केंद्रीय स्पर्धा परीक्षांच्या बाबतीत भाषेची अडचण सुरुवातीपासून चर्चिली गेली. उत्तर भारतीय किंवा दक्षिण भारतीय विद्यार्थीच या स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होण्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे उत्तर भारतात हिंदीचे आणि दक्षिण भारतात इंग्रजी भाषेचे प्राबल्य. महाराष्ट्रातील विद्यार्थी या दोन्ही भाषा जाणतात परंतु तरीदेखील या भाषांमधील अनेक शब्दांचे अर्थ लावताना द्रविडी प्राणायाम करावा लागतो हे सत्य मात्र नाकारता येणार नाही. ही बाब लक्षात घेऊन या स्पर्धा परीक्षा प्रादेशिक भाषांमधून, मातृभाषेतून घेतल्या जाव्यात अशी मागणी जोर धरू लागली व त्यानुसार या स्पर्धा परीक्षा मराठीतून देखील देता येणे शक्य झाले. तथापि या गोष्टीची जाणीव-जागृती मात्र विद्यार्थ्यांमध्ये नसल्याने अजूनही हिंदी किंवा इंग्रजीतूनच स्पर्धा परीक्षेला ते सामोरे जातात. दुसरी एक महत्त्वाची बाब म्हणजे मराठी भाषा आणि साहित्य असा विषय विशेष स्तरावर घेऊनही स्पर्धा परीक्षा देता येऊ शकते व तीमध्ये यश प्राप्त करता येऊ शकते याविषयीची जाणीव देखील विद्यार्थ्यांना नाहीय. भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र अश्या विषयांनाच प्राधान्य आज हे विद्यार्थी देताना दिसतात. त्यांच्यामध्ये मराठी भाषा व साहित्यानुषंगाने जाणीव जागृती निर्माण करण्यासाठी हा अंक महत्वाची भूमिका बजावेल असा विश्वास वाटतो.

केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग, रेल्वे, राष्ट्रीयकृत बँका, विविध शासकीय प्राधिकरणे, विविध अभ्यासक्रमांच्या पूर्व परीक्षा, शिक्षक भरती, प्राध्यापक भरतीसाठीच्या पात्रता परीक्षा, स्थानिक स्वराज्य संस्थांमधील भरती प्रक्रियेसाठी घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षांच्यासंदर्भात मराठी भाषा आणि साहित्याचा अभ्यास कसा महत्वपूर्ण ठरू शकेल? त्याचे स्वरूप नेमके कसे असते? याविषयी अभ्यासकांनी नोंदविलेली अभ्यासपूर्ण माहिती या अंकात असल्याने स्पर्धा परीक्षेला सामोरे जाणारे विद्यार्थी, त्यांचे पालक, मार्गदर्शन करणारे शिक्षक या सर्वांनाच या अंकातून मार्गदर्शन मिळेल. अर्थातच केवळ मार्गदर्शनाने इच्छित स्थळी जाता येत नाही त्यासाठी मार्गस्थ व्हावे लागते. स्वतःच वाट चालावी लागते आणि जो चालतो तोच कुठेतरी पोहचतो. योग्य मार्गदर्शन असेल तर लवकर इच्छित स्थळी पोहचता येतं. कवी म्हणतात –

**थांबला तो संपला, काळ मागे लागला**
**धावत्याला शक्ती येई आणि रस्ता सापडे**

स्पर्धा परीक्षेची वाट चालणाऱ्या अश्या सर्वांनाच त्यांच्या इच्छित इप्सितापर्यंत पोहचण्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

धन्यवाद !

**डॉ. धनराज धनगर**

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 3.009, (GIF) –0.676 (2013)
Special Issue 35 : स्पर्धा परीक्षा आणि मराठी | January 2018
UGC Approved No. 40705 & 44117

# स्पर्धा परीक्षांमधील 'अनिवार्य मराठी'आणि तिचे स्वरूप

**डॉ.राजेंद्र रामकृष्ण सांगळे**
के.व्ही.एन.नाईक महाविद्यालय
नाशिक

**प्रास्ताविक :**

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतांना काहीतरी निश्चित ध्येय आणि उद्दिष्ट घेऊन विद्यार्थी शिकत असतात. कला,वाणिज्य आणि विज्ञान या पारंपारिक विद्याशाखांचा विचार करता नोकरी आणि व्यवसायाच्या अनेक संधी या विद्याशाखेच्या पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना असतात. यातील सर्वात प्रतिष्ठेची संधी म्हणजे स्पर्धा परीक्षा आणि त्या माध्यमातून मिळणाऱ्या विविध शासकीय नोकऱ्या .आजच्या घडीला हेच एक क्षेत्र असे आहे कि जिथे कुठल्याही वशिल्याशिवाय फक्त आणि फक्त गुणवत्तेच्या जोरावर तुम्हाला तुमच्या पात्रतेनुसार चांगल्यात चांगली वर्ग १ ते वर्ग ३ ची शासकीय नोकरी मिळू शकते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने अनेक स्पर्धा परीक्षांचे यशस्वी व पारदर्शक पद्धतीने आयोजन करून उमेदवारांची गुणवत्तेच्या आधारावर अंतिम निवड करून शासनाकडे शिफारस केली जाते. साहजिकच अशा परीक्षांचे स्वरूप हे अवघड नसले तरी जटील मात्र असते. कुठल्याही एकाच विषयाचे ज्ञान तुम्हाला या परीक्षेत यश मिळवून देऊ शकत नाही.परीक्षांच्या विविध टप्प्यांवर तुम्हाला त्या त्या विषयाचे महत्व ओळखून तयारी करणे क्रमप्राप्त ठरते.

लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या या स्पर्धा परीक्षांसाठी असलेल्या अभ्यासक्रमाचा विचार केल्यास तो अनेक विद्याशाखांचा मिळून बनलेला असतो. सगळयाच विषयांना स्पर्श करणारा हा अभ्यासक्रम सर्वसमावेशक असतो. कला घटक, वाणिज्य विषयक घडामोडी, विज्ञान आणि तंत्रज्ञान , गणित आणि बुद्धिमापन चाचण्या आणि इंग्रजी , मराठी भाषेचे ज्ञान . असे साधारणपणे कुठल्याही स्पर्धा परीक्षेचे स्वरूप असते. यात पदानुसार आणि पूर्व व मुख्य परीक्षेच्या टप्प्यानुसार गुणांच्या आधारावर परीक्षेच्या पद्धतीत आणि स्वरूपात काही बदल केलेले असतात.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांच्या जसे राज्यसेवा,फॉरेस्ट सेवा, कृषी सेवा, उत्पादन शुल्क अधिकारी, तांत्रिक सहायक , पी.एस.आय., एस.टी.आय.,कर सहायक , परीक्षा, तलाठी, ग्रामसेवक, क्लर्क टायपिस्ट अशा विविध परीक्षांच्या पूर्व आणि मुख्य परीक्षांचा अभ्यासक्रम पाहिल्यावर आपल्या असे लक्षात येते कि इतर विषयाच्या ज्ञानाबरोबरच मराठी आणि इंग्रजी भाषेचे ज्ञान येथे अपरिहार्य आणि अनिवार्य ठरते. म्हणूनच स्पर्धा परीक्षामध्ये यशस्वी व्हावयाचे असल्यास तुम्हाला भाषा विषयांचा अभ्यास करणे महत्वाचे ठरते. या अनुषंगाने प्रस्तुत शोध निबंधात एम.पी.एस.सी.च्या विविध परीक्षांमध्ये मराठी भाषा आणि तिचे नेमके स्वरूप कसे आहे ? याची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजेच एम.पी.एस.सी. दोन प्रकारे उमेदवारांच्या निवडीचे काम करते. एक म्हणजे सरळ सेवा किवा थेट नेमणूक आणि दुसरा म्हणजे स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून चाळणी पद्धतीने निवड.

**सरळ सेवा किवा थेट नेमणूकीतील मराठीचे स्वरूप :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने मराठी विषयावर आधारित एक लेखी परीक्षा आणि त्यानंतर तोंडी परीक्षा घेऊन उमेदवारास थेट नेमणूक दिली जाते. अशा प्रकारच्या दोन परीक्षा येथे उदाहरणादाखल घेतल्या आहे. महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालय विभागासाठी राज्यसेवा गट क अंतर्गत

अनुवादकाची थेट नेमणूक केली जाते.या परीक्षांचे वर सांगितल्याप्रमाणे फक्त दोन टप्पे असतात. एक मम्हणजे १५० गुणांची लेखी परीक्षा आणि दुसरे म्हणजे ५० गुणांची मुलाखत. लेखी परीक्षेचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाचे असून १५० गुणांसाठी एकूण ६० प्रश्न विचारले जातात. म्हणजे साधारणपनणे एक प्रश्न २.५ (अडीच) गुणांसाठी विचारला जातो. अंतिम गुणवत्ता यादी हि वस्तुनिष्ठ परीक्षेतील व मुलाखतीतील एकत्रित गुणांवर आधारित असते. त्यामुळे लेखी परीक्षेइतकेच मुलाखतीला सुधा खूप महत्व असते.

लेखी परीक्षेतील प्रश्नांचे स्वरूप व दर्जा हा १२ वी आणि पदवी स्तरावरील मराठीच्या अभ्यासक्रमावर आधारित असतो. यात प्रामुख्याने मराठीचा शब्दसंग्रह, वाक्यरचना, वाक्याविचार, वाक्प्रचार व म्हणी, त्यांचा अर्थ आणि उपयोग, उताऱ्यावरील प्रश्न आणि त्यांची उत्तरे अशा घटकांचा आणि उपघटकांचा समावेश होतो. इंग्रजीच्या अभ्यासक्रमाचे स्वरूप साधारण पाने अशाच स्वरूपाचे असते. मुलाखतीच्या एकूण ४० गुणांपैकी अनुवाद चाचणीकरिता २० गुण आणि मुलाखतीकरिता २० गुण असे विभाजन केलेले असते.

वरिष्ठ महाविद्यालयात सहायक प्राध्यापक होण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयो:=गाणे निर्धारित आणि प्रमाणित केलेली नेट किंवा सेट हि परीक्षा उतीर्ण होणे आवश्यक असते. हि परीक्षा उतीर्ण झाल्यानंतर तुम्हाला महाराष्ट्र शासनाच्या शासकीय महाविद्यालयांमध्ये त्या त्या विषयाचे सहायक प्राध्यापक म्हणून नोकरी मिळते. शासन अनुदान प्राप्त खाजगी महाविद्यालयात फक्त मुलाखत देऊन तुमची निवड केली जाते. मात्र शासकीय महाविद्यालयात तुम्हाला एम.पी.एस.सी.मार्फत होणाऱ्या लेखी परीक्षेला आणि मुलाखतीला तोंड द्यावे लागते. मराठीच्या पदवी स्तरावरील अभ्यासावार आधारित २०० गुणांची लेखी परीक्षा आणि ५० गुणांची मुलाखत असे या परीक्षेचे स्वरूप असते. एक तासाच्या कालावधीत दोन गुणासाठी एक याप्रमाणे तुम्हाला १०० बहुपर्यायी प्रश्न अचूकपणे सोडवावे लागतात. पदवी स्तरावरील मराठीचे सखोल ज्ञान असेल तर वर्ग १ दर्जा असलेल्या या पदासाठी तुमची निवड निश्चितपणे होऊ शकते. अर्थात यासाठी तुम्हाला मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासापासून अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या इतिहासापर्यंत अनेक बारीक गोष्टी तपशिलासह माहित असणे गरजेचे असते. संत,पंत आणि तंत कवी आणि त्यांच्या रचनां बरोबरच त्यांच्या काव्यशैलीचाही तुम्हाला अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. याबरोबरच भाषाविज्ञान आणि त्याचे प्रमुख घटक,उपघटक ,साहित्यविचार,काव्यलक्षण, समीक्षेचे स्वरूप आणि प्रकार ,साहित्य प्रकार आणि त्यांची संकल्पना,मराठी साहित्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी, वाङ्मयीन चळवळी, ग्रामीण ,दलित साहित्य, काही नेमलेल्या साहित्यकृतींचा अभ्यास. जसे ह.नां.आपटे यांची वज्राघात हि कादंबरी , बालकवींची औदुंबर हि कविता, राम गणेश गडकरी यांचे एकच प्याला हे नाटक, विश्राम बेडेकरांची रणांगण हि कादंबरी , लक्ष्मीबाई टिळकांचे स्मृतिचित्रे ,बाबुराव बागुलांची सूड हि दीर्घ कथा, प्र.ई.सोनकांबळे यांचे आठवणींचे पक्षी हे आत्मकथन अशा साहित्यातील मैलाचे दगड आणि मानदंड असलेल्या साहित्यकृतींचा समीक्षात्मक अभ्यास या ठिकाणी महत्वाचा ठरतो. एकूणच या अभ्यासक्रमाचे स्वरूप पाहता ते केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या वैकल्पिक मराठी विषयाच्या अभ्यासक्रमाशी बरेच मिळतेजुळते आहे.

त्यामुळे या पदासाठी तयारी करणारे उमेदवार केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेतही सहजपणे यश मिळवू शकतात.अर्थात तेथील परीक्षापद्धती आणि तिचे स्वरूप यापेक्षा फारच वेगळ्या स्वरूपाचे असते. मात्र जिद्द, चिकाटी आणि अविरत कष्ट घेण्याची तयारी असल्यास कुठलेही यश मिळविणे अवघड नाही.

**स्पर्धा परीक्षेतील मराठीचे स्वरूप :**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वतीने राज्यसेवा, फॉरेस्ट सेवा, कृषी सेवा, उत्पादन शुल्क अधिकारी, तांत्रिक सहायक , पी.एस.आय., एस.टी.आय.,कर सहायक अशा विविध स्पर्धा परीक्षांचे आयोजन केले जाते.

या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या उमेदवारांची वर्ग १ ते वर्ग ३ दर्जाच्या विविध अधिकार पदांवर नेमणुकीसाठी आयोग शासनास शिफारस करतो. या परीक्षांचे स्वरूप स्पर्धात्मक असल्याने पूर्व, मुख्य आणि शेवटी मुलाखत अशा क्रमाने या परीक्षांचे आयोजन केले जाते. खाते आणि पदाच्या गरजेनुसार काही ठिकाणी उमेदवाराची शारीरिक चाचणी सुद्धा घेतली जाते. या सर्व परीक्षांमधील पूर्व परीक्षेचे स्वरूप हे सामान्य ज्ञान आणि इतर अनुषंगिक माहितीवर आधारित असते. मात्र मुख्य परीक्षेचे स्वरूप सर्वार्थाने भिन्न असल्याने भाषा विषयांना या परीक्षांमध्ये प्रचंड महत्व प्राप्त होते. राज्यसेवा परीक्षेच्या मुख्य परीक्षेत तर भाषा (मराठी व इंग्रजी ) हा घटक अनिवार्य असून तो उत्तीर्ण झाल्याशिवाय उमेदवाराचे इतर वैकल्पिक आणि जनरल विषयाचे पेपर तपासले जात नाही. शिवाय महत्वाची गोष्ट म्हणजे या प्रश्नपत्रिकेत मिळालेले गुण मुख्य परीक्षेच्या एकूण गुणांमध्ये समाविष्ट केले जातात. त्यामुळे अंतिम गुणवत्ता यादी जाहीर होऊन जेव्हा निकाल लागतो तेव्हा हे गुण निर्णायक असतात. मात्र केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत भाषा विषयाचे गुण मुख्य परीक्षेत धरले जात नाही. हा महत्वाचा फरक या दोन परीक्षांमध्ये असतो.जिज्ञासू उमेदवारांनी हा फरक समजून घेतला पाहिजे.

एकूणच राज्यसेवा परीक्षेच्या अंतिम निकालाच्या दृष्टीने भाषा हा विषय खूपच महत्वाचा ठरतो. त्यामुळे त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. भाषा विषयाच्या तयारीसाठी तुमच्या अंगी वाचन आणि लेखन कौशल्ये असणे अत्यावश्यक आहे. या दोन कौशल्यांच्या बळावर तुम्ही अपेक्षित यश निश्चितच प्राप्त करू शकता.

२०१६ पासून राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या मराठी व इंग्रजी विषयाच्या परीक्षेचे स्वरूप बदलण्यात आले आहे. ८०० गुणांची लेखी परीक्षा आणि १०० गुणांची मुलाखत अशा एकूण ९०० गुणांच्या परीक्षेत भाषा विषयाचे दोन पेपर उमेदवारास अनिवार्य असून ते प्रत्येकी १०० (मराठी ५० आणि इंग्रजी ५०) म्हणजे एकूण २०० गुणांसाठी आहे. या दोन्ही विषयांसाठी म्हणजे पेपर क्रमांक ४२ व ४३ साठी प्रश्नपत्रिका एकच असली तरी दोन्ही भागांसाठी दोन स्वतंत्र उत्तरपत्रिका देण्यात येतात.यातील पहिल्या पेपरचे स्वरूप हे पारंपारिक आणि वर्णनात्मक स्वरूपाचे आहे तर दुसऱ्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप हे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाचे आहे.पहिला पेपर तीन तासांसाठी असून त्यातील प्रश्नांचा दर्जा हा उच्च माध्यमिक आणि शालांत स्तरावरील मराठीचा असतो. तर दुसऱ्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांचा दर्जा हा पदवी स्तरावरील आहे.

मराठीच्या पहिल्या पेपरचे निबंध लेखन, भाषांतर आणि सारांश लेखन असे वर्णनात्मक स्वरूप असते. तर दुसऱ्या पेपर मध्ये एकूण ५० गुणांसाठी असलेल्या मराठी विषयाच्या प्रश्नपत्रिकेत म्हणी, वाक्प्रचार, समानार्थी व विरुद्धार्थी शब्द, शुद्धलेखन, विरामचिन्हे इत्यादींचा समावेश केलेला आहे. शिवाय उमेदवाराची आकलन क्षमता तपासण्यासाठी दिलेल्या उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे अचूक सोडविणे आवश्यक असते.

एम.पी.एस.सी.मध्ये किंवा इतरही स्पर्धा परीक्षांमध्ये अनेक उमेदवार भाषा विषयाकडे दुर्लक्ष करतात किंवा हा विषय गृहीत धरतात. मात्र योग्य तो सराव आणि कष्ट केले असता या विषयात पैकीच्या पैकी गुण मिळविणे अजिबात अवघड नसते. म्हणूनच मराठी भाषा हा विषय स्पर्धा परीक्षांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे.

महाविद्यालयीन स्तरावरील बऱ्याच मुलांचा एक खूप मोठा गैरसमज असतो कि स्पर्धा परीक्षा म्हणजे केवळ इतिहास आणि राज्यशास्त्र होय. आणि त्यामुळे कला शाखेतील बहुतांश मुले ह्याच मानसिकतेतून हे विषय स्पेशल म्हणून निवडतात. पणविद्यार्थ्यांनी एक लक्षात ठेवले पाहिजे कि स्पर्धा परीक्षा म्हणजे सर्वच विषयांचा सर्वसमावेशक अभ्यास होय. कुठल्याही एका विषयाला झुकते माप देवून तुम्ही

एकप्रकारे आपले अप्रत्यक्षरीत्या नुकसान करीत असतात. त्यामुळेच इतर विषयांप्रमाणेच भाषा विषय सुद्धा महत्वाचा आहे किंबहुना तो अनिवार्य आहे या भूमिकेतून या विषयाची तयारी केली पाहिजे.

संदर्भ :

१. वाळिंबे मो.रा., मराठी व्याकरण.
२. गायकवाड नागेश, मराठी व्याकरण, PDF आवृत्ती.
३. अनिवार्य मराठी , के सागर प्रकाशन
४. दैनिक लोकसत्ता, करियर वृत्तांत मधील विविध लेख.